# वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

## राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) १६ वी बैठक शुक्रवार, दि.०१/१०/२०२५ चे इतिवृत्त

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) ची १६ वी बैठक शुक्रवार, दि. ०१/१०/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली वसुंधरा, पुणे येथे Online पद्धतीने संपन्न झाली. सदर बैठकीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. कमलाकर रणदिवे | अध्यक्ष, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.० |
| २ | श्री.अरविंद उपरीकर | आयुक्त मनरेगा नागपूर यांचे प्रतिनिधी - उपायुक्त, मनरेगा, नागपूर |
| ३ | डॉ. संजय पाटील | प्रमुख, MRSAC, पुणे |
| ४ | श्री. सुभाष घाडगे | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतिनिधी - वरिष्ठ भूवैज्ञानिक |

सदर बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी स्वतंत्रपणे जोडण्यात येत आहे. बैठकीच्या सुरुवातीला कमलाकर रणदिवे, मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून विषयाचे प्रास्ताविक केले.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत अमृत सरोवर या कामांची १२ जिल्ह्यातून एकूण ४९ प्रस्ताव वसुंधरा, पुणे या कार्यालयात प्राप्त झालेले असून त्यापैकी १३ प्रस्तावास १५ व्या SLTC बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रस्तावांची GIS च्या दृष्टीने तसेच तांत्रिक दृष्टीने तपासणी करण्यात आलेली असून जे प्रस्ताव Feasible ठरले आहेत अशा प्रस्तावांना मान्यता देणेबाबत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) च्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन सफल प्राप्त प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी WCDC या समितीस शिफारस करण्यात आली. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

## अमृत सरोवर प्राप्त प्रस्ताव

| अ.क्र. | जिल्हा | गावाचे नाव | प्रकल्प क्र. | प्राप्त प्रस्तावांची रक्कम रु. लाख | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांगली | बाज-२ | १ | ३०.९३५८७ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| २ | | डफळापूर-२ | | ३१.१५१०८ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ३ | | विळूर-२ | ४ | ३०.९३५८७ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ४ | अमरावती | कारदा | २ | १२.८७७ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ५ | अकोला | चिंचखेड १ | १ | २९.५७४६६ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ६ | | पाराभवानी-२ | | २७.७९९२८ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ७ | | सावरखेड-२ | | २७.९०८९३ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ८ | | सालतवाडा | ३ | ३१.४८७६३ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ९ | बुलढाणा | पाटोदा | २ | २२.४६ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| १० | | एकलारा | | २२.४६ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ११ | | भोरसा भोरसी | | २२.४६ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे सादरीकरण करण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी एकूण ११ प्रस्ताव Feasible ठरल्याने त्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

१) अमृत सरोवर कामाची अंमलबजावणी यंत्रणा जिल्हा जलसंधारण अधिकारी राहतील.

२) WCDC ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यांच्या ज्या प्रकल्पात अमृत सरोवर च्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे त्या जिल्ह्यांनी अमृत सरोवर या बाबीवर खर्च करण्यास सुरुवात करून सदर कामाचा समावेश सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (DPR) करावा.

३) अमृत सरोवर या बांधकामासाठी NRM Governance या घटकामधून तरतूद रक्कम रु. २५.०२ कोटी पैकी रक्कम रु. ७ कोटी इतका निधी काढून घेवून उर्वरित रक्कम रु. १८.०२ कोटी या flexi-fund मधून अमृत सरोवर या बाबीवर खर्च करण्यास व सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये समाविष्ट करण्यास समितीने मान्यता दिली. याबाबतचा ratio राज्यस्तरावर mantain करण्यात येईल.

४) जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी काम पूर्ण झाल्यावर पाणीसाठा प्रमाणित करणे आवश्यक राहील.

५) मोजमाप पुस्तकातील नोंदी जलसंधारण अधिकारी यांनी करावयाच्या असून उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी मोजमापे १०० % तपासणे आवश्यक आहे.

उर्वरित परभणी, जळगाव या जिल्ह्यांनी त्रुटी पूर्तता करून पुनश्च प्रस्ताव सादर करण्याचे आणि जिल्हा बीड आणि यवतमाळ यांच्या प्राप्त प्रस्तावांची तांत्रिक तपासणी करूनच पुढील येणाऱ्या SLTC मध्ये निर्णय घेण्यात येईल, असे निर्देश समितीने दिले.

वरीलप्रमाणे सर्व मुद्द्यांवर सांगोपांग चर्चा करण्यात येऊन योग्य ते निर्देश संबधितांना देऊन कमलाकर रणदिवे, मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

1.10.25

(कमलाकर रणदिवे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २,०.
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

उपस्थित अधिकाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| २ | श्री. दिलीप प्रक्षाळे | पाणलोट विकास नियंत्रक (कोकण,पुणे,नाशिक व छ संभाजीनगर विभाग) |